शेळीपालन

# पावसाळ्यात शेळ्यांची जपणूक गरजेची!



**डॉ. अभिजित बाराते**
(मो.नं. ९१५६९८९८८९)
**डॉ. एम.एन. रांगणेकर**
**डॉ. तेजस शेंडे**
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय,
शिरवळ, जि. सातारा



पावसाळ्यात शेळी भिजली तर आजारी पडू शकते. या कारणामुळे शेळीला कोरडा चारा शेडमध्येच पुरवावा. असा बदल एकदम न करता हळूहळू कोरड्या चाऱ्याचे प्रमाण वाढवावे. शेतकरी तूर, मूग, सोयाबीन, हरभरा यांचा भुसा/ कुटार कोरडा चारा म्हणून शेळीला देऊ शकतात.

शेळ्यांची सर्वात जास्त काळजी पावसाळ्यात घ्यावी लागते. योग्य काळजी न घेतल्यास शेळीपालकांना सर्वात जास्त नुकसान पावसाळ्यात होऊ शकते. पावसाळ्यात करडांचे मरतुकीचे प्रमाणही जास्त असते. करडांचे मरतुकीचे प्रमाण कमी करण्यासाठी व शेळ्या निरोगी ठेवण्यासाठी पुढील गोष्टी कराव्यात. तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत- १) शेडचे व्यवस्थापन २) आहार व खुराक ३) पावसाळ्यातील रोग व त्यावरील उपचार.

१) **शेडचे व्यवस्थापन** : शेळ्यांचे शेड हे पूर्णपणे झाकलेले असावे. शेडमध्ये कुठेही पाणी गळणार नाही याची काळजी घ्यावी. शेडचे पाणी शेळ्यांच्या अंगावर



पडून त्या भिजल्यास त्यांना सर्दी, ताप यासारखे आजार होऊ शकतात. वेळेत उपचार न झाल्यास सर्दीचे रुपांतर न्युमोनियात होऊन शेळी दगावण्याचीही शक्यता असते. याचबरोबर शेडमध्ये पाणी गळत असेल तर शेडची जमीन ओलसर होऊन जमिनीच्या गारव्यामुळे देखील शेळीला सर्दी, ताप, खोकला, न्युमोनिया यासारखे आजार होऊ शकतात. तसेच शेडच्या ओलसर जमिनीमध्ये अनेक जिवाणू तयार होतात व त्यामुळे रोगही होऊ शकतात.

शेळ्यांचे शेड स्वच्छ व निर्जंतुकीकरण केलेले असावे. शेळ्यांचे मूत्र- लेंड्या दिवसातून २-३ वेळा साफ करून घ्याव्यात. आपल्याकडील शेड मोठे असल्यास त्यात कंपार्टमेंट बनवून शेळ्यांना एका कंपार्टमेंटमधून दुसऱ्या कंपार्टमेंटमध्ये हलवावे; जेणेकरून आधीचे कंपार्टमेंट कोरडे होण्यास मदत होईल व साफसफाई देखील व्यवस्थित करता येईल. शेड साफ न केल्यास शेडच्या घाणीत उवा, पिसवा, गोचिड होऊन ते आजारास कारणीभूत होऊ शकतात. अस्वच्छ शेडमध्ये अमोनियासारख्या रसायनाची उत्पत्ती होते व शेडमध्ये हवा खेळती नसल्यास शेळ्यांच्या डोळ्यांवर दुष्परिणाम होऊ शकतो. अस्वच्छ शेडमध्ये पावसाच्या पाण्यामुळे कॉकसिडोइसिस या रोगाचा प्रादुर्भाव होऊ शकतो. शेडमध्ये पाणी साचत असल्यास शेळ्यांना खुरांचा आजार देखील होऊ शकतो.

शेडच्या बाहेर आजूबाजूला पाणी साठलेले नसावे. अशा साठलेल्या पाण्यामुळे दुर्गंध, डास, कीटक यांची पैदास होऊन ते शेडमध्ये येऊ शकतात. शेडच्या पत्र्यावरून पडणारे पाणी वाहून जाईल याची व्यवस्था करून घ्यावी. शेडच्या आजूबाजूचे वातावरण निर्जंतुक करून घ्यावे. असे केल्यास बाहेरचे जंतू गोठ्यात प्रवेश करू शकणार नाहीत. पावसाळ्यात शेडच्या प्रवेशद्वाराजवळ चुना टाकावा तसेच शेडमधील जमिनीवरही चुना भरल्यास शेळ्यांना बाहेरून येणाऱ्या रोगांचा कमीत कमी प्रादुर्भाव होईल. तसेच शेडमधील मल-मूत्राचा निचरा गोठ्यापासून लांब असावा. कारण पावसाळ्यात त्यात पाणी साठून दुर्गंध, डास, कीटक, माश्या तयार होऊन आजारास कारणीभूत ठरू शकतात.

पावसाळ्यात पाऊस पडून वातावरण थंड होते, अशा वेळी शेडचे वातावरण उबदार राहील याची व्यवस्था करा. शेळ्यांना विशेषकरून करडांना थंडी लागणार नाही याची विशेष काळजी घ्यावी. वातावरण उबदार ठेवण्यासाठी गोठ्यात २-३ वेळा शेकोटी करावी. शेडचे वातावरण उबदार ठेवण्यासाठी तुम्ही हॅलोजन बल्ब, हिटर, जास्ती वॅटचे बल्ब (२०० वॅट, ५०० वॅट) यांचा वापरही करू शकता.



२) **आहार व खुराक** : पावसाळ्यात हिरवा चारा येतो तेव्हा शेळ्या खूप चारा खातात. अशा चाऱ्यात पाण्याचे

प्रमाण अधिक व फायबरचे प्रमाण कमी असते. अशा हिरव्या चाऱ्यामुळे शेळ्यांच्या पोटात पाण्याचे प्रमाण जास्त होते. पचनासाठी आवश्यक असणारे फायबर त्यात खूप कमी असते. त्यामुळे शेळ्यांना हगवण लागू शकते. ओल्या चाऱ्यामध्ये/ गवतामध्ये सूक्ष्मजीव जास्त प्रमाणात तयार होतात. असे गवत शेळ्यांनी खाल्ल्यास त्या आजारी पडण्याची शक्यता असते. या कारणांमुळे पावसाळ्यात ओला चारा सूर्यप्रकाशात वाळवून घ्यावा. जेणेकरून पचनास त्रास होणार नाही व सूक्ष्मजीवांमुळे होणारा धोका देखील टाळता येऊ शकतो. पावसाळ्यात ओला चारा आणि पशुखाद्य यांची साठवणूक ओलविरहीत ठिकाणी करावी; जेणेकरून त्याला बुरशी लागणार नाही.

पावसाळ्यात शेळी भिजली तर आजारी पडू शकते. या



कारणामुळे शेळीला कोरडा चारा शेडमध्येच पुरवावा. असा बदल एकदम न करता हळूहळू कोरड्या चाऱ्याचे प्रमाण वाढवावे. शेतकरी तूर, मूग, सोयाबीन, हरभरा यांचा भुसा/ कुटार कोरडा चारा म्हणून शेळीला देऊ शकतात.

चाऱ्याबरोबरच शेळीला एक-दोन वेळा खुराक/ पेंड द्यावी. सरकी पेंड/ सुग्रास या गोष्टीही शक्य असल्यास देऊ शकता. अशा आहारामुळे शेळीचे शरीर गरमी तयार करते. याद्वारे पावसाळ्यातील थंडी/ गारव्यामुळे होणारे आजार टाळता येतील. सर्व शेळ्यांना खनिज मिश्रण/ चाटण वीट पुरवावी जेणेकरून कमतरतेचे आजार होणार नाहीत व शेळ्या निरोगी राहतील. पावसाळ्यात शेळी घाण पाणी/ पावसाचे पाणी पिणार नाही याची काळजी घ्यावी. असे दूषित/ घाण पाणी प्यायल्यास शेळी आजारी पडू शकते. शेळीला ताजे स्वच्छ पाणी मुबलक प्रमाणात पुरवावे.

३) **पावसाळ्यातील रोग व त्यावरील उपचार :** पावसाळ्यातील ढगाळ दमट वातावरणात शेळ्यांच्या पोटात व आतड्यात परजीवी/ कृमी होण्याची शक्यता असते. त्यामुळे पावसाळ्यापूर्वीच जंतनाशक योग्य प्रमाणात द्यावे. पावसाळ्यात होणाऱ्या वेगवेगळ्या आजारांची (लाळ्या खुरकूत, आंत्रविषार, घटसर्प व पीपीआर) यांची लस पावसाळा सुरु होण्यापूर्वी कमीत कमी दोन महिने आधीच टोचून घ्यावी. लसीकरण व्यवस्थित केल्यास शेळ्यांमध्ये रोगप्रतिकारक शक्ती निर्माण होते व त्यांना वरील आजार होण्याची शक्यता कमी होते. पावसाळ्यात शेळ्यांना ताप, सर्दी, हगवण, खुरांना जखमा अशा प्रकारचे आजार झाल्यास प्रथम त्यांना कळपापासून वेगळे करावे व त्यांच्यावर योग्य तो उपचार करावा. असे केल्याने कळपातील इतर शेळ्या बाधित होणार नाहीत.

शेळीला सर्दी झाल्यास सुरुवातीच्या काळात त्यांचे नाक साफ करून निलगिरी तेल लावून सर्दी दूर करण्याचा प्रयत्न करावा. सर्दी कमी न झाल्यास पशुवैद्यक डॉक्टरांकडून उपचार करून घ्यावेत. शेळीला खासकरून पिलांना हगवण लागल्यास पशुवैद्यक डॉक्टरांकडून उपचार करून घ्यावेत कारण पावसाळ्यात पिल्ले दगावण्याची शक्यता जास्त असते. पावसाळ्यात शेळ्यांना खूर सुजणे/ खुरांवर जखमा होणे यासारखे त्रास होतात. पावसाळ्यात खुरांमध्ये चिखल अडकतो. त्यात काटा/ दगड रुततो व खुरे सुजू शकतात. याचबरोबर शेळ्यांची खुरे पाण्यात राहिल्यामुळे सादळतात व त्यावर सहजपणे जखमा होतात. खुरांना जखमा झाल्यास अशा शेळ्या लंगडायला लागतात. ज्या शेळ्यांमध्ये अशी लक्षणे आढळतील त्यांची खुरे गरम पाण्याने धुवून घ्यावीत. पोटॅशियम परमँगनेट पाण्यात घालून असे पाणी देखील जखमा धुण्याकरिता वापरू शकता. जखम छोटी असेल तर त्यावर हळद किंवा ॲन्टिसेप्टिक क्रीम लावावी. जखमेत सुधार होत नसेल तर पशुवैद्यक डॉक्टरांकडून उपचार करून घ्यावेत.

या तीन बाबींची काळजी घेतल्यास शेळ्यांना पावसाळ्यातील वातावरणात निरोगी ठेवता येईल व शेळीपालकांचे नुकसानही होणार नाही. ■